**तहसिलदार कार्यालयातील सेतू सुविधा केंद्राच्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करणेबाबत.**

## प्रेसनोट

महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९,दि.१९ जानेवारी २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्यात सध्या कार्यरत असलेली सर्व महा ई सेवा केंद्र, सेतू सुविधा केंद्र नागरी सुविधा केंद्र तसेच संग्राम केंद्र यांना आपले सरकार सेवा केंद्र हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हीस सेंटरचे एकसारखे ब्रँडिंग करणेत आले आहे. सध्या प्रत्येक तालुक्याचे तहसिल कार्यालयातील सेतूच्या ठिकाणी (करवीर तालुका वगळून) अ०ापले सरकार केंद्र स्थापन करावयाचे आहे. याबाबत यापूर्वी १ मार्च,२०२० ते ३१ मार्च, २०२० या कालावधीमध्ये अर्ज मागणी करणेत आले होते. कोव्हीड-१९ च्या पार्श्वभूमीवर सदर कामास दि. २७/०३/२०२० रोजी स्थगिती देणेत आली होती. तरी आता सदरची कार्यवाही पुन्हा सुरु करणेत येत असून **दि. १ ऑक्टोबर २०२० ते ३१ ऑक्टोबर २०२०** या कालावधीमध्ये इच्छूक नागरीकांनी अर्ज करावेत. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://kolhapur.gov.in या संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन घेणेत यावा. सदरचे अर्ज दिलेल्या मुदतीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील.

यापूर्वी दि. १ मार्च ते ३१ मार्च, २०२० या कालावधीमध्ये अर्ज केलेल्या नागरीकांनी पुन्हा अर्ज करणेची आवश्यकता नाही. सदर कालावधीतील अर्जांचा या प्रक्रीयेमध्ये समावेश करणेत येईल.